MHWS080013322022

## रे.मु.नं. ९७/२०२२ मधील निशाणी क्र. २३ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रीया संहीतेचे नियम ०६ आदेश १७ व कलम १५१ प्रमाणे मूळ दाव्यात दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथनानुसार, वादीला मूळ दाव्यात काही दुरुस्त्या करुन काही माहिती समाविष्ट करणे व कमी करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे दावा परिच्छेद क्र.०२ मध्ये उपपरिच्छेद क्र.०३ ओळ क्र.०९ मध्ये 'त्याबाबत वादी हा योग्य त्या कोर्टामध्ये योग्य ती कायदेशीर कार्यवाही करुन दाद मागणारच आहे' हे वगळण्याचे असून परिच्छेद ०२ चे शेवटी 'सुशिला विजय शिंदे यांना वाशिम येथील जिल्हा न्यायालय येथे रे.दि.अ.क्र.२९/२०१६ भिमराव —वी— सखाराम तुकाराम तुरुकमाने वगैरे या प्रकरणामध्ये प्रतिवादी पार्टीपक्ष करण्याच्या दृष्टिने वादीने अर्ज केलेला आहे' असा मजकूर समाविष्ट करणेचा आहे. तसेच परिच्छेद क्र.०७—अ मध्ये ओळ क्र.०७ 'या दोन्ही प्रकरणाचा निकाल लागेपावेतो' हा मजकूर वगळण्याचा आहे. सदर दुरुस्त्यांमुळे दाव्याचे स्वरुपात बदल होत नसून प्रतिवादीचे नुकसान होत नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल केले. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादीच्या सदर दुरुस्ती अर्जामुळे दाव्याचे स्वरुप बदलत असून वादी दुरुस्तीदवारे रे.दि.अ.नं. २९/२०१६ बाबत दाव्याचे कामी मजकूर नमूद करु इच्छित असल्याने सदरचा अर्ज कायदेशीर नाही त्यामुळे तो खर्चासह रदद करण्यात यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी याने हजर होउन नि.क्र.०९ वर लेखी जबाब सादर केलेला आहे. त्यानंतर नि. क्र.१४ वर मुददे काढण्यात आले असून दावा वादीचे पुराव्यावर प्रलंबित आहे. प्रस्तुतच्या अर्जादवारे वादीने दावा परिच्छेद क्र.०२ व ०७ अ मधील काही मजकूर

वगळून त्यामध्ये रे.दि.अ.नं.२९/२०१६ मधील वस्तुस्थितीबाबत दुरुस्ती समाविष्ट करण्याची मागणी केलेली आहे. वादीने प्रस्तुत अर्जादवारे मागितलेली दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादीचे देखील कोणतेही नुकसान होणार असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज निशाणी क्र. २३ मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | वादीला असा आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी सदर अर्जातील प्रस्तावित दुरुस्ती मूळ दाव्याचे कामी या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करावी व तशी दावा दुरुस्तीप्रत या कामी सादर करावी. |
| ३. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2025.01.09 17:22:46 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दिनांक ०९.०१.२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H. A. Uchade. |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 09.01.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 09.01.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 09.01.2025 |